# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3814/शि.वि./2015
दि.04/03/2015

**प्रति,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ/उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा.,नागपूर.

**विषय :– शाळांनी किशोर मासिकचे वर्गणीदार होणेबाबत.**

**संदर्भ :– मा.संचालक पाठयपुस्तक मंडळ, पूणे –4 यांचे पत्र क्र.किशोर/वितरण/1276 दि.10.02.2015 चे पत्र.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मीती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ ही शासननिर्मीत संस्था असून इयत्ता पहिली ते आठवीची पाठयपुस्तके, शिक्षक हस्तपुस्तिका, अध्ययन व अध्यापनाच्या पाठ्येतर प्रकाशनाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अवांतर वाचनासाठी 'किशोर' मासिक दरमहा प्रसिध्द करीत आहे. लहान मुलांचे संस्कारक्षम वय लक्षात घेवून मनोरंजनातून ज्ञानसंवर्धन साधण्यासाठी मंडळ या उपक्रमाव्दारे विशेष प्रयत्न करीत आहे. किशोरचा प्रत्येक अंक हा आबाल वृध्दांसाठी वाचनीय तथा संग्राह्य ठरला आहे. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यात ते रंगीत मासिक 44 वर्षे महत्वाची भुमिका बजावत आहे. किशोर मासिकाची वार्षिक वर्गणी केवळ 80/– रू. (दिवाळी अंकासोबत) आहे. सदर 'किशोर' मासिक आपल्या शाळेत सुरू करण्याबाबत मा.संचालक पाठयपुस्तक मंडळ, पूणे –4 यांनी संदर्भिय पत्राव्दारे कळविले आहे.

किशोर मासिकची वर्गणी पुढील पत्त्यावर मनीऑर्डर किंवा राष्ट्रीयकृत बँकेच्या पूणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टव्दारे भरता येईल.

**– पत्रव्यवहाराचा पत्ता –**

**संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मीती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती' सेनापती बापट मार्ग पूणे 411004.**

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलिपी :–**

1. मा. आयुक्त, म.न.पा., नागपूर यांच्या माहितीस्तव सादर

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc